# गुरुमाई चिद्विलासानंदांचे दर्शन आणि त्यांचे प्रज्ञान

१. दर्शन हृदयात होते. ती शक्तीची गतिशीलता आहे जी हृदयात होते.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२. खऱ्या साधकांना ही तीव्र उत्कंठा असते की, ज्यांना-ज्यांना ते भेटतील, त्या सर्वांमध्ये त्यांना भगवंताच्या मुखकमलाचे दर्शन व्हावे; ते जिथे कुठे जातील, तिथे-तिथे त्यांना भगवंताची उपस्थिती अनुभवास यावी; सर्व दिशांना त्यांनी दिव्य प्रकाश चमचमताना पहावा; त्यांना ही अनुभूती व्हावी की, ते ब्रह्मांडाच्या कणाकणाशी एकाकार आहेत.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

३. सिद्धयोग मार्गाचा परम उद्देश आहे, आपल्या अंतरात्म्याला जाणणे, आपल्या स्वतःच्या दिव्य सत्त्वाचा सन्मान करणे आणि त्याची पूजा करणे. तुम्ही जेव्हा हा परम उद्देश पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल करता, तेव्हा तुम्ही तुमच्या स्वतःच्या दिव्य सारतत्त्वाच्या स्वरूपापर्यंत पोहोचता—जे आहे परम आनंद.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

४. कल्पना करा की, शुष्क धरणीवर पावसाचे थेंब पडत आहेत. तुम्ही पाहू शकता का की, भूमी कशी नरम आणि सुपीक बनते? अशाच प्रकारे, भक्तीचे थेंब हृदयाची सर्वोत्कृष्टता प्रकट करतात.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

५. उत्कृष्ट सद्गुण सतत एका रमणीय निवासाच्या शोधात असतात. तुम्ही सुयोग्य आहात असे आढळताच, ते येऊन तुमच्या अंतरी वास्तव्य करतात.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

६. कृपेच्या उपस्थितीत काळ निःस्तब्ध होतो. अज्ञानाचा पडदा दूर होतो; प्रकाश प्रवाहित होतो. तुमचे संपूर्ण अस्तित्व देदीप्यमान होते; अंतर-नाद ऐकू येतो. जीवात्मा परमात्म्याशी एकाकार होतो.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

७. तुमच्या हृदयात जेव्हा खुलेपणा असतो, तुम्ही जेव्हा स्वतःच्या हृदयात असता, तेव्हा तुम्ही सूर्योदय, वृक्ष, पर्वत यांना ज्या प्रकारे पाहता, ते विलक्षण असते, ते अनुपम असते. पुन्हापुन्हा, तुमचे लक्ष स्वतःच्या हृदयाच्या भव्यतेकडे आणा.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

८. नामसंकीर्तन आणि ध्यान करताकरता, तुम्हाला ती महानता दिसू लागते, जी तुमच्या अंतरी विद्यमान आहे; तुम्हाला स्वतःच्या अंतरी एका संपूर्ण नव्या लोकाची झलक दिसू लागते. तुमच्या आंतरिक जगतापर्यंत जाणाऱ्या ज्या पुलाची निर्मिती तुम्ही करत आहात, तो जेव्हा सशक्त होत जातो आणि दूरवर पोहोचतो, तेव्हा तुम्हाला परम आत्म्याच्या महिम्याची अनुभूती होऊ लागते; तुम्हाला दिव्य प्रकाशाचे, ज्योतिर्मय परमेश्वराचे दर्शन होऊ लागते. तेव्हा तुम्हाला मनुष्याची खरी योग्यता ज्ञात होते.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

९. भगवंताचे स्तुतिगान करणे, एका स्थानाला दुसऱ्या स्थानाशी, एका हृदयाला दुसऱ्या हृदयाशी जोडते. ते तुम्हाला प्रफुल्लित करते. तुम्हाला एक नवा उल्हास प्राप्त होतो. सिद्धयोग मार्गावर, या आनंदमय ध्वनीला नामसंकीर्तन म्हणतात.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१०. जे सर्वोच्च आहे, ते अनुभवण्यासाठी, परमात्म्याचा अनुभव घेण्यासाठी तुम्हाला स्वप्रयत्न करावाच लागेल. अशा प्रकारे, जेव्हा तुम्हाला गुरुकृपा प्राप्त होईल, तेव्हा ती सदैव तुमच्यासमवेत राहील.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

११. तुम्ही जेव्हा प्रार्थना करता, तेव्हा तुम्ही त्या वायुमंडलात प्रवेश करता जे भगवंताच्या अंतरात आहे; तुम्ही वास्तवात त्याच्या अस्तित्वात प्रवेश करता. प्रार्थना भगवंताशी संवाद साधण्याचे साधन आहे. प्रार्थना आश्वासन देते. प्रार्थना ते चुंबक आहे जे भगवंताच्या उपस्थितीला आकर्षित करते.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१२. सेवा परमोधर्मः, “निःस्वार्थ सेवा हा परम धर्म आहे.” सेवेमध्ये हृदय भगवंताच्या आदेशाचे पालन करण्यासाठी तत्पर व उत्कंठित होते.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१३. तुम्ही आपल्या अंतरातील गहन मौनाचे रसास्वादन केलेच पाहिजे. तुम्ही जेव्हा पूर्णपणे स्थिर होता, तेव्हा तुम्ही त्या वस्तू पाहू शकता ज्या वैभवशाली आहेत, पण बहुधा दुर्लक्षित केल्या जातात, जसे कमळाच्या पानावर पडलेल्या पाण्याच्या थेंबामध्ये ताऱ्याचे प्रतिबिंब. त्या पूर्ण स्थिरतेला सिद्धयोग ध्यान म्हणतात.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१४. वाळवंटातील हळुवारपणे वाहणारी वाऱ्याची झुळूक
हे शब्द गुणगुणते—
शिवदृष्टी
ॐ नमः शिवाय
शिवभाव
शिवोऽहम्
शिवदर्शन
हे सर्व शिव आहे.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१५. तुम्ही जेव्हा ध्यानाद्वारे वारंवार अंतर्मुखी होत राहता, तेव्हा तुम्हाला स्वतःच्या अस्तित्वातील त्या भागाची अनुभूती होऊ लागते जो पूर्णतः जागृत आहे. ही जागृतावस्था नित्य विद्यमान, नित्य प्रशांत, नित्य झगमगणारी, नित्य देदीप्यमान, नित्य प्रवाहित होणारी शक्ती आहे.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१६. आरंभी प्रेम. अखेरीस प्रेम. मध्ये, आपल्याला सद्गुणांचा विकास करायचा आहे.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१७. सिद्धयोगाचे तत्त्वज्ञान हे आहे : आपण जी व्यक्ती आणि जी वस्तू पाहतो, त्यामध्ये चमचमणारा नीलप्रकाश अनुभवणे; इतरांच्या गरजा समजून घेणे; सदैव हृदयाचे मृदुल, प्रेममय आणि निश्चिंत स्पंदन अनुभवणे; अलगदपणे चालणे आणि मधुर बोलणे; अनिर्बंधपणे भगवंताचे महिमागान करणे; सर्व प्राणिमात्रांना भगवंताच्या एका बृहत् कुटुंबरूपात पाहणे; प्रत्येक वस्तूमध्ये व प्रत्येकामध्ये परम आत्म्याला ओळखणे. हेच तुमचे लक्ष्य बनवा. हाच तुमचा संकल्प बनवा. हाच तुमचा मार्ग बनवा.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१८. ओऽम् अस्ताला जाणारा सूर्य बनतो,
ओऽम् रात्रीच्या आकाशावरील पांघरूण बनतो,
ओऽम् सुस्पष्ट स्वप्नांचे आवाहन करतो,
ओऽम् एक कृपाळू मानव-मुख बनतो,
ओऽम् सर्वकाही आहे आणि ओऽम् शून्य आहे,
ओऽम्च्या आशीर्वादांचा वर्षाव होतो.
हरिः ॐ तत्सत्.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

१९. शास्त्रग्रंथांमध्ये जितकी अनुष्ठाने सांगितली गेली आहेत, त्यांपैकी सर्वाधिक प्रभावशाली आहे, मानसपूजा.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२०. ध्यान ती शक्ती आहे जी मनाला स्वतःच्या स्रोताकडे आकृष्ट करते आणि मनाला व शरीराला आपल्या तेजाने भरून टाकते. केवळ ध्यानाच्या माध्यमातून मनुष्य शाश्वततेला स्पर्श करतो.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२१. श्रीगुरू अंतरातही आहेत आणि बाहेरही. श्रीगुरू समीपही आहेत आणि दूरदेखील. तुम्ही कोणत्याही स्थानी, कोणत्याही वेळी, गुरुशक्तीची, गुरुतत्त्वाची अनुभूती करू शकता. तुम्ही भूतकाळातील अनेक वर्षांपूर्वीही याचा अनुभव घेऊ शकता. तुम्ही भविष्यातील अनेक वर्षांनंतरही याचा अनुभव घेऊ शकता. आणि तुम्ही आत्ता, या वर्तमान क्षणात गुरुशक्तीची अनुभूती करू शकता.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२२. "मी महान आहे," हे जेव्हा तुम्ही अनुभवता, तेव्हा तुम्ही स्वतःच्या अंतरी महान सद्‌गुणांच्या उपस्थितीचे आवाहन करत असता.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२३. तुमची हीच कामना असू द्या, की तुम्हाला भगवंताचे दर्शन व्हावे. सदैव. तुम्ही जे काही कराल, जिथे कुठे जाल, ज्याच्याशीही बोलाल, तुमची गहनतम इच्छा हीच असू द्या, "हे ईश्वरा, या व्यक्तीमध्ये तू स्वतःला प्रकट कर, या वस्तूमध्ये, माझ्या धर्मामध्ये, या कार्यामध्ये तू प्रकट हो. मी जे काही जाणून घेईन, जे काही प्राप्त करेन, तू तिथे असावे."

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२४. तुम्ही जेव्हा पूर्ण हृदयाने पूजा करता, तेव्हा अद्‌भुत भक्ती जागृत होते. पूजा ते द्वार आहे ज्यामधून भगवंत आपल्या भक्तांवर आपल्या प्रेमाचा वर्षाव करू शकतो.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२५. एक साधेसे जास्वंदाचे फूल जीवनाचा
उत्सव साजरा करते,
जेव्हा ते त्या प्रेमाला आपल्या श्वासात

सामावून घेते, जे प्रेम ब्रह्मांडाच्या शक्तीने,
त्याच्या रचयित्याने त्याच्यामध्ये
भरले आहे.
प्रत्येक जीव या प्रेमास, जीवनास
आणि दिव्यतेस पात्र आहे.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२६. सिद्धयोग हा कृपेचा, श्रीगुरूंच्या प्रचुर कृपेचा योग आहे. मुक्तपणे आणि सहज-स्वाभाविकपणे ही कृपा साधकांच्या जीवनात प्रवेश करते. तथापि, साधकामध्ये गुरुकृपेचे पूर्णपणे उन्मीलन व्हावे यासाठी तिची ही मागणी असते, की साधकांनी त्यांच्या शोधाच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी सच्चा आणि सम्यक प्रयत्न करावा.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२७. तुम्ही जर निसर्गाचे बारकाईने निरीक्षण केले, तर तुम्हाला असे आढळून येईल की, निसर्ग सतत अंतर्मुखी होत असतो. मग तो समुद्र असो किंवा वृक्ष, पशू असोत किंवा फुले; माती असो किंवा हवा, अग्नीच्या ज्वाळा असोत किंवा आकाश असो, निसर्ग सतत स्वतःकडे परतण्याच्या प्रक्रियेत असतो. जरी निसर्ग बाह्य दिशेला विस्तृत होताना दिसत असला, तरीदेखील सत्य हे आहे की, निसर्गाची अंतर्मुखी होण्याची प्रक्रियादेखील सतत सुरू असते.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२८. केवळ एकच प्रकाश आहे, तुमच्या स्वतःच्या हृदयाचा महान प्रकाश. या बोधासह ध्यान करा :
“मी प्रकाश आहे. प्रकाश मी आहे. मी प्रकाश आहे. मी आहे.”

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

२९. विस्मय, आश्चर्य, चमत्कार . . . विस्मयाचा अनवरत भाव मनाला आणि हृदयाला सजग ठेवतो.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

३०. तुम्ही जेव्हा मंत्रजप करता, तेव्हा तो तुम्हाला त्या वेळी बळ देतो जेव्हा तुम्हाला बळाची आवश्यकता असते; आणि जेव्हा तुम्हाला माधुर्याची आवश्यकता असते, तेव्हा तो तुम्हाला माधुर्य देतो. जे काही श्रेष्ठ आहे आणि कल्याणकारक आहे, मंत्र हा त्याचे भांडार आहे.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

३१. धन्य आहेत ते लोक ज्यांना कृतज्ञतेच्या भावामध्ये गहन आश्वासन मिळते. धन्य आहेत ते लोक जे त्या वस्तूंविषयी स्वतःला जागरूक ठेवतात ज्यांच्याकरिता त्यांनी कृतज्ञ असायला हवे आणि अशा प्रकारे ते कृतज्ञतेला एक आध्यात्मिक अभ्यास बनवतात. धन्य आहेत ते लोक ज्यांच्याकडे ही सुवर्णसंधी आहे की, ते आपल्या जीवनात कृपेच्या उपस्थितीकरिता आपली कृतज्ञता व्यक्त करू शकतात.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

३२. हृदयात प्रवेश करणे म्हणजे सूर्याच्या केंद्रस्थानात येण्यासारखे आहे. तुम्ही उरतच नाही; त्या प्रकाशाच्या सप्तरंगी शक्तीव्यतिरिक्त दुसरे काहीही नसते. जेव्हा तुम्ही सूर्याच्या केंद्रस्थानी असता, तेव्हा कोणत्याही मार्गाने त्याचा प्रकाश अवरुद्ध केला जाऊ शकत नाही. तो तुमच्यातून आणि तुमच्या सभोवताली प्रवाहित होतो. अतः तुमच्या स्वतःच्या हृदयात प्रवेश केल्याने, तुम्ही संपूर्ण जगताला एक अधिक चांगला स्वर्ग बनविता.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

३३. जे मला माझ्या वास्तविक रूपात जाणतात ते हे जाणतात की, मी तुमच्यासोबत आहे. तुमच्याबद्दल मला जे प्रेम आहे, जर तुम्ही केवळ त्यावर आपली श्रद्धा ठेऊ शकलात, तर तुम्हाला सर्वकाही प्राप्त होईल.

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.
[स्वामी] चिद्विलासानंद, गुरुमाई आणि सिद्धयोग
एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®ची नोंदणीकृत व्यापारचिह्ने आहेत.